CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

★ मुंबई, मंगळवार,
१७ डिसेंबर २०२४

# मेट्रोला 'आयएसओ' मानांकन

## गुणवत्तेचे मानांकन मिळवणारी नवी मुंबई मेट्रो राज्यातील पहिली सेवा



लोकसत्ता प्रतिनिधी

**नवी मुंबई :** सिडको महामंडळाच्या नवी मुंबई मेट्रोसेवेची वर्षपूर्ती नुकतीच झाली. याच मेट्रोसेवेला आय.एस. ओ. गुणवत्तेच्या मानांकनाची मोहोर प्रदान करण्यात आली आहे. सिडकोच्या जनसंपर्क विभागाने सोमवारी याची माहिती दिली. हे आयएसओ मानांकन मेट्रो सेवेतील गुणवत्ता व्यवस्थापन, व्यावसायिक स्वास्थ्य तथा सुरक्षा व्यवस्थापन आणि पर्यावरण व्यवस्थापन प्रणाली या सर्व तीन श्रेणींमध्ये दिले जात असून आयएसओ मानांकने मिळविणारी सिडको नवी मुंबई मेट्रो ही राज्यातील पहिली सेवा ठरली आहे.

मागील वर्षी १७ नोव्हेंबरला माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर सिडको मंडळाने नवी मुंबई मेट्रोसेवेला सुरुवात केली. मेट्रोसेवेच्या वर्षपूर्तीला महिना उलटत नाही तोच मेट्रोच्या परिचलन सेवेतील गुणवत्ता, पर्यावरण, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता यांचे उत्कृष्ट व्यवस्थापन करण्याच्या निकषावर सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेणधर या मेट्रो परिचालन सेवेला आयएसओ ९००१, आयएसओ १४००१ आणि आयएसओ ४५००१ मानांकने प्राप्त झाली आहेत. महा मेट्रो रेल कॉर्पोरेशन मार्फत ब्रिटीश स्टँडर्ड्स इन्स्टिट्यूशन (BSI) द्वारे प्रदान करण्यात आलेले हे प्रमाणपत्र सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल यांना सुपूर्द करण्यात आले.

> आयएसओ मानांकनांद्वारे उच्चतम दर्जाची मेट्रो सेवा पुरविण्यासह गुणवत्ता, शाश्वतता आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सिडकोच्या कटिबद्धतेवर विश्वास दर्शविण्यात आला आहे. नगर विकास आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील सिडकोचे अग्रणी स्थान याद्वारे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.
>
> - विजय सिंघल, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, सिडको

चार महिन्यांपूर्वी सिडको मंडळाने प्रवाशांच्या मागणीनंतर मेट्रोचे तिकीट दर ३३ टक्यांनी कमी करुन प्रवाशांना दिलासा दिला होता. त्यामुळे मेट्रो सेवेला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. सिडकोने नवी मुंबईतील नागरिकांना प्रवासाचा सुरक्षित, विश्वासार्ह आणि शाश्वत पर्याय उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांवर या मानांकनामुळे शिक्कामोर्तब झाले आहे.

ब्रिटिश मानक संस्था ( British Standards Institution - BSI) यांच्या तर्फे देण्यात येणारी तीन आयएसओ मानांकने सिडको मेट्रोला, महा मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून प्राप्त झाली आहेत. आयएसओ ९००१:२०१५ मानांकन हे नवी मुंबई मेट्रोची उच्च दर्जाची सेवा, प्रवाशांचे समाधान आणि परिचालनाची कार्यक्षमता वाढवणे, या निकषावर प्राप्त झाले आहे.

सिडकोतर्फे महा मेट्रोच्या माध्यमातून नवी मुंबई मार्ग क्र. १ वरील मेट्रोच्या परिचालन व देखभाली संबंधित विविध बाबींकरिता पद्धती आणि नियमांची काटेकोरपणे व सातत्याने अंमलबजावणी करण्यात आली आहे. आयएसओ मानांकनांद्वारे जागतिक मानकांची पूर्तता करण्याच्या आणि मेट्रो सेवेची गुणवत्ता सुधारण्याच्या सिडकोच्या प्रयत्नांवर मोहोर उमटविण्यात आली आहे.

सिडकोच्या मेट्रो सेवेला मिळालेले आयएसओ मानांकन हे देशातील मेट्रो प्रणालींकरिता आदर्श ठरणार आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

महाराष्ट्र टाइम्स
मुंबई | मंगळवार, १७ डिसेंबर २०२४

# नवी मुंबई मेट्रोला तीन 'आयएसओ'



म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई

गुणवत्ता, पर्यावरण, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता यांचे उत्कृष्ट व्यवस्थापन करण्याच्या निकषावर सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मेट्रो परिचालन सेवेला आयएसओ ९००१, आयएसओ १४००१ आणि आयएसओ ४५००१ मानांकने प्राप्त झाली आहेत. ही तिन्ही आयएसओ मानांकने प्राप्त करणारी नवी मुंबई मेट्रो ही राज्यातील एकमेव मेट्रो सेवा ठरली आहे. महामेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत ब्रिटिश स्टँडर्ड्स इन्स्टिट्यूशनद्वारे (बीएसआय) प्रदान केलेले प्रमाणपत्र सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल यांना सुपूर्द करण्यात आले.

सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मार्गावर १७ नोव्हेंबर २०२३पासून मेट्रो सेवेचे परिचालन सुरू झाले. या मेट्रो सेवेला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. आयएसओ मानांकनाद्वारे सिडको मेट्रोच्या उत्कृष्ट परिचालनासह नवी मुंबईतील नागरिकांना प्रवासाचा सुरक्षित, विश्वासार्ह आणि शाश्वत पर्याय उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांवर शिक्कामोर्तब झाले आहे.

आयएसओ मानांकनांद्वारे उच्चतम दर्जाची मेट्रो सेवा पुरविण्यासह गुणवत्ता, शाश्वतता आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सिडकोच्या कटिबद्धतेवर विश्वास दर्शविण्यात आला आहे. नगर विकास आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील सिडकोचे अग्रणी स्थान याद्वारे पुन्हा एकदा अधोरेखित झाले असल्याचे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सांगितले.




सकाळ मुंबई, मंगळवार, १७ डिसेंबर २०२४

# नवी मुंबई मेट्रोवर गुणवत्तेची मोहोर

नवी मुंबई, ता. १६ : गुणवत्ता, पर्यावरण, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता यांचे उत्कृष्ट व्यवस्थापन करण्याच्या निकषावर सिडकोच्या नवी मुंबई मेट्रोच्या मार्ग क्र. एकवरील बेलापूर ते पेंधर या मेट्रो परिचालन सेवेला आयएसओ तीन मानांकने प्राप्त झाली आहेत. अशा प्रकारची तीनही आयएसओ मानांकने प्राप्त करणारी नवी मुंबई मेट्रो ही राज्यातील एकमेव मेट्रो सेवा ठरली आहे.

ब्रिटिश मानक संस्था यांच्यातर्फे देण्यात येणारी तीन आयएसओ मानांकने सिडको मेट्रोला, महा मेट्रो रेले कॉर्पोरेशनच्या माध्यमातून प्राप्त झाली आहेत. आयएसओ ९००१:२०१५ मानांकन हे नवी मुंबई मेट्रोची उच्च दर्जाची सेवा, प्रवाशांचे समाधान या निकषावर प्राप्त झाले आहे. आयएसओ १४००१:२०१५ मानांकन हे मेट्रो परिचालनाच्या शाश्वत पद्धतींचा अवलंब करून पर्यावरणावरील परिणाम कमी करणे, संसाधनांची कार्यक्षमता वाढवणे आणि त्या प्रदेशातील पर्यावरणाचे जतन करणे, या निकषावर प्रदान करण्यात आले आहे. आयएसओ ४५००१:२०१८ मानांकन हे सहभागी कर्मचारी व कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षितता जपणे, आरोग्य व सुरक्षाविषयक नियमांचे काटेकोरपणे पालन करणे, या निकषांवर प्रदान करण्यात आले आहे.

> आयएसओ मानांकनांद्वारे उच्चतम दर्जाची मेट्रो सेवा पुरविण्यासह गुणवत्ता, शाश्वतता आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सिडकोच्या कटिबद्धतेवर विश्वास दर्शविण्यात आला आहे. नगरविकास आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील सिडकोचे अग्रणी स्थान याद्वारे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.
>
> - विजय सिंघल, व्यवस्थापकीय संचालक, सिडको

पुढारी महामुंबई मुंबई, मंगळवार, १७ डिसेंबर २०२४

# नवी मुंबई मेट्रो सेवेला आयएसओ मानांकन

**नवी मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

गुणवत्ता, पर्यावरण, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता यांचे उत्कृष्ट व्यवस्थापन करण्याच्या निकषावर सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मेट्रो परिचालन सेवेला आयएसओ ९००१, आयएसओ १४००१ आणि आयएसओ ४५००१ मानांकने प्राप्त झाली आहेत. अशा प्रकारची तीनही आयएसओ मानांकने प्राप्त करणारी नवी मुंबई मेट्रो ही राज्यातील एकमेव मेट्रोसेवा ठरली आहे.

नवी मुंबई मेट्रो लाईनला परिचालनाच्या पहिल्याच वर्षी तिन्ही आयएसओ प्रमाणपत्रे मिळाली आहेत. अशी तिन्ही आयएसओ प्रमाणपत्रे मिळालेली ही महाराष्ट्रातील एकमेव मेट्रो लाईन आहे. महामेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत ब्रिटिश स्टँडर्ड्स इन्स्टिट्यूशनद्वारे प्रदान केलेले प्रमाणपत्र शान्तनू गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना सुपूर्द करण्यात आले.

सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मार्गावर १७ नोव्हेंबर २०२३ पासून मेट्रो सेवेचे परिचालन सुरू झाले असून या मेट्रो सेवेला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

ब्रिटिश मानक संस्था यांच्यातर्फे देण्यात येणारी तीन आयएसओ मानांकने सिडको मेट्रोला, महामेट्रो रेले कॉर्पोरेशनच्या माध्यमातून प्राप्त झाली आहेत. आयएसओ ९००१:२०२५ मानांकन हे नवी मुंबई मेट्रोची उच्च दर्जाची सेवा, प्रवाशांचे समाधान आणि परिचालनाची कार्यक्षमता वाढवणे, या निकषावर प्राप्त झाले आहे.



> आयएसओ मानांकनांद्वारे उच्चतम दर्जाची मेट्रो सेवा पुरविण्यासह गुणवत्ता, शाश्वतता आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सिडकोच्या कटिबद्धतेवर विश्वास दर्शविण्यात आला आहे. नगर विकास आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील सिडकोचे अग्रणी स्थान याद्वारे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.
>
> -**विजय सिंघल**, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

**प्रहार** | मुंबई | मंगळवार, १७ डिसेंबर २०२४

### तीन आयएसओ मानांकने प्राप्त करणारी राज्यातील सिडकोची एकमेव मेट्रो सेवा

# आयएसओ मानांकनाद्वारे नवी मुंबई मेट्रो सेवेवर उमटली गुणवत्तेची मोहोर

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी):**



गुणवत्ता, पर्यावरण, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता यांचे उत्कृष्ट व्यवस्थापन करण्याच्या निकषावर सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मेट्रो परिचालन सेवेला आयएसओ ९००१, आयएसओ १४००१ आणि आयएसओ ४५००१ मानांकने प्राप्त झाली आहेत. अशा प्रकारची तिन्ही आयएसओ मानांकने प्राप्त करणारी नवी मुंबई मेट्रो ही राज्यातील एकमेव मेट्रो सेवा ठरली आहे.

नवी मुंबई मेट्रो लाईनला परिचालनाच्या पहिल्याच वर्षी तिन्ही आयएसओ प्रमाणपत्र मिळाली आहे. सदर तिन्ही आयएसओ प्रमाणपत्र मिळालेली ही महाराष्ट्रातील एकमेव मेट्रो लाइन आहे. महामेट्रो रेल कॉर्पोरेशन मार्फत ब्रिटीश स्टँडर्ड्स इन्स्टिट्यूशनद्वारे प्रदान केलेले प्रमाणपत्र शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना सुपुर्द करण्यात आले.

सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मार्गावर १७ नोव्हेंबर २०२३ पासून मेट्रो सेवेचे परिचालन सुरू झाले असून या मेट्रो सेवेला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. आयएसओ मानांकनाद्वारे सिडको मेट्रोच्या उत्कृष्ट परिचालनासह नवी मुंबईतील नागरिकांना प्रवासाचा सुरक्षित, विश्वासार्ह आणि शाश्वत पर्याय उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांवर शिक्कामोर्तब झाले आहे.

सिडकोतर्फे महामेट्रोच्या माध्यमातून नवी मुंबई मार्ग क्र. १ वरील मेट्रोच्या परिचालन व देखभाली संबंधित विविध बाबींकरिता पद्धति आणि नियमांची काटेकोरपणे व सातत्याने अंमलबजावणी करण्यात आली आहे. आयएसओ मानांकनांद्वारे जागतिक मानकांची पूर्तता करण्याच्या आणि मेट्रो सेवेची गुणवत्ता सुधारण्याच्या सिडकोच्या प्रयत्नांवर मोहोर उमटविण्यात आली आहे. सिडकोच्या मेट्रो सेवेला मिळालेले आयएसओ मानांकन हे देशातील मेट्रो प्रणालींकरिता आदर्श ठरणार आहे.

> "आयएसओ मानांकनांद्वारे उच्चतम दर्जाची मेट्रो सेवा पुरविण्यासह गुणवत्ता, शाश्वतता आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सिडकोच्या कटिबद्धतेवर विश्वास दर्शविण्यात आला आहे. नगर विकास आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील सिडकोचे अग्रणी स्थान याद्वारे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे."
>
> **- विजय सिंघल**
> उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको



CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

आपलं महानगर मुंबई : मंगळवार १७ डिसेंबर २०२४

# नवी मुंबई मेट्रोला ३ आयएसओ मानांकन

## सिडको ठरली महाराष्ट्रातील एकमेव मेट्रो



✦ **नवी मुंबई।** गुणवत्ता, पर्यावरण, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता यांचे उत्कृष्ट व्यवस्थापनाबद्दल शहराचे शिल्पकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिडकोच्या मेट्रोला मानांकन मिळाले आहे. अशा प्रकारची तिन्ही आयएसओ मानांकने प्राप्त करणारी नवी मुंबई मेट्रो ही राज्यातील एकमेव मेट्रो सेवा ठरली आहे.

सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मेट्रो परिचालन सेवेला आयएसओ ९००१, आयएसओ १४००१ आणि आयएसओ ४५००१ मानांकने प्राप्त झाली आहेत.

नवी मुंबई मेट्रो लाईनला परिचालनाच्या पहिल्याच वर्षी तिन्ही आयएसओ प्रमाणपत्र मिळाली आहे. सदर तिन्ही आयएसओ प्रमाणपत्र मिळालेली ही महाराष्ट्रातील एकमेव मेट्रो लाइन आहे. महा मेट्रो रेल कॉर्पोरेशन मार्फत ब्रिटीश स्टँडर्ड्स इन्स्टिट्यूशनद्वारे प्रदान केलेले प्रमाणपत्र शान्तनू गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक-सिडको यांना सुपुर्द करण्यात आले.

सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मार्गावर १७ नोव्हेंबर २०२३ पासून मेट्रो सेवेचे परिचालन सुरू झाले असून या मेट्रो सेवेला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. आयएसओ मानांकनाद्वारे सिडको मेट्रोच्या उत्कृष्ट परिचालनासह नवी मुंबईतील नागरिकांना प्रवासाचा सुरक्षित, विश्वासार्ह आणि शाश्वत पर्याय उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांवर शिक्कामोर्तब झाले आहे.

ब्रिटिश मानक संस्था यांच्यातर्फे देण्यात येणारी आयएसओ मानांकने सिडको मेट्रोला, महा मेट्रो रेले कॉर्पोरेशनच्या माध्यमातून प्राप्त झाली आहेत. आयएसओ ९००१:२०१५ मानांकन हे नवी मुंबई मेट्रोची उच्च दर्जाची सेवा, प्रवाशांचे समाधान आणि परिचालनाची कार्यक्षमता वाढवणे, या निकषावर प्राप्त झाले आहे. आयएसओ १४००१:२०१५ मानांकन हे मेट्रो परिचालनाच्या शाश्वत पद्धतींचा अवलंब करून पर्यावरणावरील परिणाम कमी करणे, संसाधनांची कार्यक्षमता वाढवणे आणि त्या प्रदेशातील पर्यावरणाचे जतन करणे, या निकषावर प्रदान करण्यात आले आहे.

> आयएसओ मानांकनांद्वारे उच्चतम दर्जाची मेट्रो सेवा पुरविण्यासह गुणवत्ता, शाश्वतता आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सिडकोच्या कटिबद्धतेवर विश्वास दर्शविण्यात आला आहे. नगर विकास आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील सिडकोचे अग्रणी स्थान याद्वारे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.
>
> – **विजय सिंघल**, सिडको–व्यवस्थापकीय संचालक

नवराष्ट्र ठाणे, मंगळवार, १७ डिसेंबर २०२४

# नवी मुंबई मेट्रोला आयएसओ मानांकन

**नवी मुंबई,** (वा.) गुणवत्ता, पर्यावरण, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता यांचे उत्कृष्ट व्यवस्थापन करण्याच्या निकषावर सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मेट्रो परिचालन सेवेला आयएसओ ९००१, आयएसओ १४००१ आणि आयएसओ ४५००१ मानांकने प्राप्त झाली आहेत. अशा प्रकारची तिन्हीं आयएसओ मानांकने प्राप्त करणारी नवी मुंबई मेट्रो ही राज्यातील एकमेव मेट्रो सेवा ठरली आहे. नवी मुंबई मेट्रो लाईनला परिचालनाच्या पहिल्याच वर्षी तिन्ही आयएसओ प्रमाणपत्र मिळाली आहे. या तिन्ही आयएसओ प्रमाणपत्र मिळालेली ही महाराष्ट्रातील एकमेव मेट्रो लाइन आहे. महा मेट्रो रेल कॉर्पोरेशन मार्फत ब्रिटीश स्टँड' इन्स्टिट्यूशन द्वारे प्रदान केलेले प्रमाणपत्र शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना सुपुर्द करण्यात आले.



"आयएसओ मानांकनांद्वारे उच्चतम दर्जाची मेट्रो सेवा पुरविण्यासह गुणवत्ता, शाश्वतता आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सिडकोच्या कटिबद्धतेवर विश्वास दर्शविण्यात आला आहे. नगर विकास आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील सिडकोचे अग्रणी स्थान याद्वारे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे

-विजय सिंघल, उपाध्यक्ष, सिडको

## सिडकोच्या प्रयत्नांना मिळाले यश

सिडकोतर्फे महा मेट्रोच्या माध्यमातून नवी मुंबई मार्ग क्र. १ वरील मेट्रोच्या परिचालन व देखभाली संबंधित विविध बाबोंकरिता पद्धति आणि नियमांची काटेकोरपणे व सातत्याने अंमलबजावणी करण्यात आली आहे. आयएसओ मानांकनांद्वारे जागतिक मानकांची पूर्तता करण्याच्या आणि मेट्रो सेवेची गुणवत्ता सुधारण्याच्या सिडकोच्या प्रयत्नांवर मोहोर उमटविण्यात आली आहे. सिडकोच्या मेट्रो सेवेला मिळालेले आयएसओ मानांकन हे देशातील मेट्रो प्रणालींकरिता आदर्श ठरणार आहे.

## सेवा, समाधान आणि कार्यक्षमता

आयएसओ मानांकनाद्वारे सिडको मेट्रोच्या उत्कृष्ट परिचालनासह नवी मुंबईतील नागरिकांना प्रवासाचा सुरक्षित, विश्वासार्ह आणि शाश्वत पर्याय उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांवर शिक्कामोर्तब झाले आहे. ब्रिटिश मानक संस्था यांच्यातर्फे देण्यात येणारी तीन आयएसओ मानांकने सिडको मेट्रोला, महा मेट्रो रेले कॉर्पोरेशनच्या माध्यमातून प्राप्त झाली आहेत. आयएसओ ९००१:२०२५ मानांकन हे नवी मुंबई मेट्रोची उच्च दर्जाची सेवा, प्रवाशांचे समाधान आणि परिचालनाची कार्यक्षमता वाढवणे, या निकषावर प्राप्त झाले आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मुंबई, मंगळवार, १७ डिसेंबर २०२४ — मुंबई तरुण भारत — www.mahamtb.com

### नवी मुंबई मेट्रो सेवेवर उमटली गुणवत्तेची मोहोर

# मेट्रोला ३ आयएसओ मानांकने

### ३ मानांकन प्राप्त करणारी राज्यातील एकमेव मेट्रो सेवा

**नवी मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी**

गुणवत्ता, पर्यावरण, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता यांचे उत्कृष्ट व्यवस्थापन करण्याच्या निकषावर सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मेट्रो परिचालन सेवेला 'आयएसओ ९००१', 'आयएसओ १४००१' आणि 'आयएसओ ४५००१' मानांकने प्राप्त झाली आहेत. अशाप्रकारची तिन्ही 'आयएसओ' मानांकने प्राप्त करणारी नवी मुंबई मेट्रो ही राज्यातील एकमेव मेट्रो सेवा ठरली आहे.



'आयएसओ' मानांकनांद्वारे उच्चतम दर्जाची मेट्रो सेवा पुरविण्यासह गुणवत्ता, शाश्वतता आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सिडकोच्या कटिबद्धतेवर विश्वास दर्शविण्यात आला आहे. नगरविकास आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील सिडकोचे अग्रणीस्थान याद्वारे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे, अशी प्रतिक्रिया सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिली आहे.

नवी मुंबई मेट्रो लाईनला परिचालनाच्या पहिल्याच वर्षी तिन्ही 'आयएसओ' प्रमाणपत्र मिळाली आहेत. ही तीन 'आयएसओ' मानांकने सिडको मेट्रोला, 'महामेट्रो रेले कॉर्पोरेशन'च्या माध्यमातून प्राप्त झाली आहेत. तिन्ही 'आयएसओ' प्रमाणपत्र मिळालेली ही महाराष्ट्रातील एकमेव मेट्रो लाईन आहे.

'महामेट्रो रेल कॉर्पोरेशन' मार्फत 'ब्रिटिश स्टॅण्डर्ड्स इन्स्टिट्यूशन'द्वारे प्रदान केलेले प्रमाणपत्र शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना सुपूर्द करण्यात आले. सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मार्गावर दि. १७ नोव्हेंबर २०२३ रोजीपासून मेट्रो सेवेचे परिचालन सुरू झाले आहे. 'आयएसओ' मानांकनाद्वारे सिडको मेट्रोच्या उत्कृष्ट परिचालनासह नवी मुंबईतील नागरिकांना प्रवासाचा सुरक्षित, विश्वासार्ह आणि शाश्वत पर्याय उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांवर शिक्कामोर्तब झाले आहे. 'आयएसओ' मानांकनांद्वारे जागतिक मानकांची पूर्तता करण्याच्या आणि मेट्रो सेवेची गुणवत्ता सुधारण्याच्या सिडकोच्या प्रयत्नांवर मोहोर उमटविण्यात आली आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मुंबई, मंगलवार
17.12.2024
नवभारत

# नवी मुंबई मेट्रो को तीनों आईएसओ मानक हुए प्राप्त

## तीनों मानकों को पाने वाली राज्य की पहली मेट्रो सेवा



■ **नवी मुंबई, (सं).** सिडको द्वारा शुरू की गई नवी मुंबई मेट्रो रूट नंबर 1 बेलापुर से पेंढर मेट्रो परिचालन सेवा को आईएसओ 9001, आईएसओ 14001 और आईएसओ 45001 प्रमाणन प्राप्त हुआ है, जिसके बाद नवी मुंबई मेट्रो ऐसे तीनों आईएसओ मानकों को हासिल करने वाली राज्य की एकमात्र मेट्रो सेवा बन गई है. सिडको ने बताया कि नवी मुंबई मेट्रो लाइन को अपने संचालन के पहले वर्ष में सभी तीन आईएसओ प्रमाणन प्राप्त हुए हैं. यह महाराष्ट्र की एकमात्र मेट्रो लाइन है जिसे तीनों आईएसओ प्रमाणपत्र प्राप्त हुए हैं. महा मेट्रो रेल कॉर्पोरेशन के माध्यम से ब्रिटिश स्टैंडर्ड इंस्टीट्यूशन (बीएसआई) द्वारा प्रदान किया गया प्रमाण पत्र सिडको के संयुक्त प्रबंध निदेशक शांतनु गोयल को सौंपा गया. सिडको की नवी मुंबई मेट्रो परियोजना रूट नंबर एक 17 नवंबर 2023 से बेलापुर से पेंढर तक मेट्रो सेवा का परिचालन शुरू किया गया है और इस मेट्रो सेवा को यात्रियों से अच्छी प्रतिक्रिया मिल रही है. आईएसओ प्रमाणन के साथ

*आईएसओ प्रमाण के माध्यम से उच्चतम गुणवत्ता की मेट्रो सेवाएं प्रदान करने के साथ-साथ सर्वोच्च प्राथमिकता के रूप में गुणवत्ता, स्थिरता और सुरक्षा के प्रति सिडको की प्रतिबद्धता का एक प्रमाण है। शहरी विकास और बुनियादी ढांचे के क्षेत्र में सिडको की अग्रणी स्थिति एक बार फिर रेखांकित हुई है.*

*-विजय सिंघल, उपाध्यक्ष एवं प्रबंध निदेशक, सिडको*

सिडको मेट्रो का उत्कृष्ट प्रदर्शन नवी मुंबई के नागरिकों को एक सुरक्षित, विश्वसनीय और सस्ती यात्रा विकल्प प्रदान करने के उसके प्रयासों का प्रमाण है. सिडको मेट्रो को महा मेट्रो रेल कॉर्पोरेशन के माध्यम से बीएसआई से तीन आईएसओ प्रमाणपत्र प्राप्त हुए हैं. नवी मुंबई मेट्रो को अपनी उच्च गुणवत्ता वाली सेवा, यात्री संतुष्टि और बढ़ी हुई परिचालन दक्षता के लिए आईएसओ 9001:2025 प्रमाणन प्राप्त हुआ है. 14001:2015 प्रमाणन पर्यावरणीय प्रभाव को कम करने, और मेट्रो संचालन के टिकाऊ तरीकों संरक्षित करने के मानदंडों पर प्रदान किया जाता है.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 1 Dec 17, 2024

# नवी मुंबई मेट्रोला आयएसओ मानांकन

## उत्तम व्यवस्थापनावर लावली मोहोर



लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** गुणवत्ता, पर्यावरण, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता यांचे उत्कृष्ट व्यवस्थापन करण्याच्या निकषावर नवी मुंबई मेट्रोला तीन प्रकारामधील आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. अशा प्रकारे मानांकन मिळविणारी ही राज्यातील पहिली मेट्रो सेवा ठरली आहे.

सिडकोने बेलापूर ते पेंधर मार्गावर १७ नोव्हेंबर २०२३ पासून मेट्रो सेवा सुरू करून प्रवाशांना सर्वोत्तम सुविधा देण्यासाठी प्रयत्न केला आहे. दर्जेदार मेट्रो सेवा देण्यासाठीचे सर्व निकषांचे पालन करण्यात येत आहे. याची दखल घेऊन ब्रिटिश मानक संस्थेच्या माध्यमातून देण्यात येणारी तीनही मानांकने सिडको मेट्रोला महा मेट्रो रेल कार्पोरेशनच्या माध्यमातून प्राप्त झाली आहेत. उच्च दर्जाची सेवा, प्रवाशांचे समाधान व परिचलनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आयएसओ ९००१ प्राप्त झाले आहे. पर्यावरणाचे जतन करण्यासाठी आयएसओ १४००१ व कर्मचाऱ्यांचे आरोग्य व सुरक्षितता या नियमांचे काटेकोर पालन केल्याबद्दल आयएसओ ४५००१ मानांकन दिले आहे.

पहिल्याच वर्षी तीनही आयएसओ प्रमाणपत्र मिळाली असून, महा मेट्रो रेल कार्पोरेशनमार्फत ही प्रमाणपत्र सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल यांच्याकडे सोपविली आहेत.

> आयएसओ मानांकनांद्वारे उच्चतम दर्जाची मेट्रो सेवा पुरविण्यासह गुणवत्ता शाश्वतता आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सिडकोच्या कटिबद्धतेवर विश्वास दर्शविला आहे. नगरविकास आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील सिडकोचे अग्रणी स्थान याद्वारे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.
>
> -विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

Newsband Tuesday, 17 December 2024

# CIDCO's Navi Mumbai Metro secures ISO certifications for Quality, environment and safety



By Chandrashekhar Hendve
@seashekhar

**Navi Mumbai:** The City and Industrial Development Corporation of Maharashtra Ltd. (CIDCO) proudly announces that its Navi Mumbai Metro, operated by Maharashtra Metro Rail Corporation Limited (Maha Metro), has achieved the prestigious ISO 9001, ISO 14001, and ISO 45001 certifications. These accolades recognize the metro's commitment to excellence in Quality Management, Environmental Sustainability, and Occupational Health & Safety.

The Navi Mumbai Metro is the only metro line in Maharashtra to PAGE 9

## CIDCO'S NAVI MUMBAI METRO SECURES...

CONTINUED FROM PAGE...1

secure all three ISO certifications within its first year of operation. These certifications, awarded by the British Standards Institution (BSI), were received by Shri Shantanu Goel, Joint Managing Director, CIDCO.

The certifications reflect Navi Mumbai Metro's proactive approach to delivering safe, reliable, and sustainable services:

- ISO 9001:2015 emphasizes consistent quality services and customer satisfaction.
- ISO 14001:2015 highlights sustainable practices aimed at reducing environmental impact.
- ISO 45001:2018 underscores a commitment to employee health and safety through rigorous protocols.

Vijay Singhal, Vice Chairman & Managing Director of CIDCO, remarked, "The ISO certifications reinforce CIDCO's dedication to providing world-class metro services while prioritizing quality, sustainability, and safety, cementing our leadership in urban development and infrastructure."

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

# Navi Mumbai Metro Bags Triple ISO Certifications In Its First Year Of Service

The Metro line has secured ISO certifications for quality, environment and safety.

Travel | PTI | Updated: December 17, 2024 9:40 am IST



The certifications were awarded by the British Standards Institution through Maha Metro.

**Thane:** The Navi Mumbai Metro, which started operations in November 2023, has been awarded three globally recognized ISO certifications for quality, environment and safety standards, the Maharashtra government's planning agency CIDCO said on Monday. Operated by Maharashtra Metro Rail Corporation Ltd (Maha Metro), the (ISO 9001, ISO 14001 and ISO 45001) certifications have been received within its very first year of operations, said the City and Industrial Development Corporation (CIDCO), which has implemented the project.

These certifications validate the metro's commitment to maintaining world-class standards in quality management, environmental responsibility, and occupational health and safety, an official release by CIDCO said.

This significant milestone marks Navi Mumbai Metro as the only metro line in Maharashtra to receive all three ISO certifications within its very first year of operations. The certifications were awarded by the British Standards Institution (BSI) through Maha Metro, said the release.